Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २५२ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.२३ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाच्या कार्यातून संवेदनशीलता दिसावी-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापनचा आढावा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो व त्यामुळे पूर येवून अनेक गावांचा संपर्क तुटतो. पावसाळ्यात येणाऱ्या या आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे,अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्या.

गडचिरोली जिल्हा आपत्ती व्यवस्थापनचा आढावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नियोजन भवन येथे घेतला. आमदार देवराव होळी, आ. कृष्णा गजबे, जिल्हाधिकारी संजय दैने, नक्षल विरोधी अभियानाचे महानिरीक्षक अंकित गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री निलोत्पल, माजी खासदार अशोक नेते यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री यांनी आपत्ती काळात प्रत्येक जीव वाचविने हे आपले कर्तव्य असून यासाठी अलर्ट राहून आवश्यक सर्व उपाययोजना करण्याचे सांगितले. गोसेखुर्द प्रकल्प व श्रीराम सागर बॅरेज या इतर जिल्ह्यातील व राज्यातील प्रकल्पातून पाणी सोडतांना त्याची पूर्वसूचना मिळावी यासाठी संबंधीत यंत्रणेशी संपर्कात राहावे. जिल्ह्यातील महत्वाचे रस्त्यांची डागडूजी करून ते दुरूस्त करावे. पूरामुळे संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये नवसंजीवन योजनेअंतर्गत आगावू उपलब्ध करून दिलेले धान्य व साहित्य संबंधितापर्यंत पोहोचले की नाही याची खात्री करणे, विद्युत विभागाने लाईनमन गावातच उपलब्ध राहील याची तपासणी करणे, सर्व धरणांवर सिंचन विभागाद्वारे कार्यान्वित केलेली देखरेख व्यवस्था सुव्यवस्थितपणे कार्यरत आहे का याचीही शहानिशा




करण्याचे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याचे निर्देशही ना.फडणवीस यांनी दिले.आमदार देवराव होळी व कृष्णा गजभे तसेच माजी खासदार अशोक नेते यांनीदेखील यावेळी आपले प्रश्न मांडले. लोकप्रतिनिधींच्या सूचनांची गांभिर्याने नोंद घेण्याचे ना .फडणवीस यांनी सांगितले. जिल्हाधिकारी संजय दैने यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील पूरपरिस्थिती व उपाययोजनांची माहिती दिली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील संबंधीत वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### किटाळी येथे कॉन्फरन्स हॉल व बॅरेकचे उद्घाटन

गडचिरोली पोलिस दलाच्या सी.टी.सी. किटाळी येथील कॉन्फरन्स हॉल व महिला पोलिस अंमलदार बॅरेकचे उद्घाटन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचा अजब कारभार, ऐन पावसाळ्यात डांबरीकरण



**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील दक्षिण भागात भर पावसात रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा अजब प्रकार समोर आलाय.त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केला जात आहे.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी रस्ते विकासाचे काम सुरू असले तरी सध्या पावसाळा असल्याने डांबरीकरणाचे काम करता येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग आलापल्ली अंतर्गत येत असलेल्या जिमलगट्टा ते देचलीपेठा रस्त्यावर किष्टापूर ते सिंधा पर्यंत जवळपास ६ ते ७ किलोमीटर डांबरीकरण काम केले जात आहे.मागील अनेक वर्षापासून या रस्त्यावर नागरिकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर रस्ते विकास कामाला कोट्यवधी रुपये मंजूर करण्यात आले. मात्र संबंधित कंत्राटदाराने भर पावसाळ्यात डांबरीकरणाचे काम सुरू केल्याने हा रस्ता किती दिवस टिकणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.यापूर्वी देखील रस्त्याच्या कामात मुरूम ऐवजी मातीचा वापर केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला होता. सध्या डांबरीकरणाचे काम सुरू असून त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणतेही अधिकारी उपस्थित नसल्याने संबंधित कंत्राटदार मनमानी कारभार करत असल्याचे दिसून येत आहेत.विशेष म्हणजे ढगाळ वातावरण आणि पावसात रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा अजब प्रकार समोर आला आहे.विशेष म्हणजे डांबरीकरण सुरू असलेल्या परिसरातील खड्ड्यात पाणी देखील साचला आहे.

**सदर काम सुरुवातीपासूनच अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहे. आता या भागात पावसानेही हजेरी लावली आहे. त्यामुळे पावसात केलेले डांबरीकरण कसे टिकणार ? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावर यांनी उपस्थित केला आहे.**

# डॉ.सतिश वारजुकर यांचे कडून अडेगाव( देश) येथील अपघात ग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील अडेगाव (देश) येथील दोन युवकांचा दुचाकीवरून अपघात झाला होता. त्या अपघातग्रस्त कुटुंबाला फुल न फुलाची पाकळी .म्हणून राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर यांनी भेट घेऊन आर्थिक मदत केली .

चिमूर तालुक्यातील अडेगाव (देश) येथील युवक विरापाल भगवान चौधरी व कार्तिक भगवान चौधरी या तरुणांचा कामावर जात असताना टाटा एस गाडीने धडक दिल्याने दोन्ही भाऊ गंभीर जखमी झाले . याची माहिती काँग्रेस कार्यकर्ते लटारू सूर्यवंशी यांनी राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर यांना दिली असता अडेगाव ( देश ) येथे कुटुंबीयांची भेट घेऊन आधार देत आर्थिक मदत केली.या वेळी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस गजानन बुटके, चिमूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. विजय गावंडे, जेष्ठ काँग्रेस नेते विवेक कापसे, चिमूर तालुका काँग्रेस



कमिटी सचिव विजय डाबरे, काँग्रेस कार्यकर्ते लटारुजी सूर्यवंशी व गावकरी उपस्थित होते.

# काँग्रेस कमिटीने केला रेंगाबोडी रस्त्यावर काळे झेंडे व बेशरमाचे झाडे लावून शासनाचा निषेध



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूरवरून हिंगणघाटमार्गे वर्धा जाणारा कमी अंतराचा मार्ग म्हणून वाहनधारक हिंगणघाट ते खडसंगी मार्गाला पसंती देतात. त्यामुळे या मार्गावर वाहतूक मोठ्या प्रमाणात आहे. मागील काही महिन्यांपासून हिंगणघाट ते खडसंगी या राज्य मार्गाचे काम सुरू आहे. मात्र कोरा, आमडी, रेंगाबोडी हा रस्ता पूर्णतः खोदून माती टाकण्यात आली आहे. पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल झाल्यामुळे वाहनचालकांना चिखलात रस्ता शोधावा लागत आहे. त्याच प्रमाणे शेतीचा हंगाम सुरु असून शेतकऱ्यांना सुद्धा रस्त्याने जाणे येणे करण्याकरिता त्रास सहन करावा लागत आहे. माती मिश्रित मुरूम टाकल्याने या रस्त्यावर कधीही अपघात होऊ शकतो. त्याच प्रमाणे रस्त्याच्या बाजूने नाली बांधकाम केले मात्र पाणी जाण्यासाठी कुठलेही वेवस्था केली नाही. शेतकऱ्यांच्या शेतावर जाणारा रस्ता पूर्ण चिखलमय झाला आहे चिमूर हिंगणघाट जाणारा रस्ता हा आमडी भिवंकुंड पर्यंत चिमूर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत येतो, तर भिवंकुंड पासून नंदोरी हिंगणघाट रस्ता हा बांधकाम विभाग हिंगणघाट यांच्या हद्दीत येतो मात्र या रस्त्यावर पूर्ण नियंत्रण हे हिंगणघाट बांधकाम विभाग यांच्याकडे आहे. या रस्त्यावर प्रशासनाचे व कंत्राटदाराचे दुर्लक्ष आहे. याची माहिती मिळताच राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमुर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजुकर यांनी रेंगाबोडी येथे जाऊन पाहणी केली. व काँग्रेस पदाधिकारी व गावकऱ्यांसोबत काळे झेंडे व बेशरम चे झाडे लावून निषेध व्यक्त केला.

या वेळी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस गजानन बूटके, चिमूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. विजय गावंडे, काँग्रेस नेते विवेक कापसे,शिवसेना नेते प्रशांत कोल्हे,शांताराम धानोरकर,बबन कुबडे, तेजराम झाडे,विनायक वाकडे, खटू कोवे, मनोहर तराळे, शंकर नंन्नावरे, भैया कारेकर, देवरावजी लाटकर, सूरज गलांडे, वैभव वाकडे, रामाजी शेंडे, गुरुदेव तराळे, कृष्णा बारस्कार, अमित तराळे, सूरज रामूगुंडे, उमेश ठोंबरे, गजाजन थुटे,व गावकरी मंडळी उपस्थित होते.

# कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी दिले मेसा येथील शेतकऱ्यांना बीज उगवण क्षमता चाचणीचे प्रशिक्षण

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय आनंदवन वरोरा येथील विद्यार्थीनींनी ' बीज उगवण क्षमता चाचणी' हा उपक्रम मेसा येथे राबवला. या अंतर्गत मेसा येथे शेतकऱ्यांना व बीज उगवण क्षमता चाचणीचे महत्व पटवून दिले.

' बीज उगवण क्षमता चाचणी' करिता योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून आयोजित करण्यात आलेल्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस एस पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ आर बी महाजन, कार्यक्रम समन्वयक आर व्ही तायडे आणि कार्यक्रम अधिकारी डॉ पी के अकोटकर व डॉ अश्विनी मानकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला होमेश्वरी वानखेडे, खुशी सोनटक्के, हर्षदा ताजने, जान्हवी विवाहुत् व आदिती वैद्य इत्यादी विद्यार्थिनींचा समावेश होता.



# गळफास लावून इसमाची आत्महत्या

**मूल । प्रतिनिधी**

राजोली रोडवरील चितेगाव येथे एका इसमाने एका झाडाला फाशी लागून असल्याचे उघडकीस आली.गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शनिवार सकाळी १०वाजता उघडकीस आली.



दिलीप वसंत कुमरे वय वर्षे ४८ असे फाशी लागून आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. मृतक दिलीप कुमरे हे ट्रक चालक होते. ते कालपासून घरून निघून गेले होते. आज सकाळी चितेगाव बस स्थानकालगत एका झाडाला फाशी लागून असल्याचे उघडकीस आली.ही घटना गावात पसरतात गावकऱ्यांनी बघण्याकरिता गर्दी केली होती. त्यानंतर घटनेची माहिती मुल पोलीस स्टेशनला देण्यात आली.मृतदेह मूल येथिल उपजिल्हा रुग्णालयात छवविच्छेदन व तपासणी करिता नेण्यात आले आहे. मात्र आत्महत्या कशासाठी केली हे अद्याप कळले नाही. पुढील तपास मूल पोलीस करीत आहे.

# आर्ट ऑफ लिव्हिंग पुलगाव द्वारा योग दिवस



**पुलगाव । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंग पुलगाव शाखेच्या वतीने योग दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

स्थानिय मातृसेवा सभागृहात आयोजित या कार्यक्रमांची सुरुवात गुरुपुजन व दीप प्रज्वलनाने झाली. यानंतर सामुहिक प्रार्थना घेण्यात आली. योग प्रशिक्षक योगेश पुरोहित यांनी विविध आसने, योगिक क्रिया, प्राणायाम,ध्यान याबद्दल मार्गदर्शन केले.आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने सतत प्रशिक्षण शिबीर सुरु असतात. त्याचप्रमाणे शहरात नियमित दर रविवारी सामुहिक एकत्रिकरण व योगाभ्यास असतो. योग कार्यक्रमात मोठ्या संख्येने युवा, महिला, पुरुष सहभागी झाले होते.शिबिराच्या यशस्वितेसाठी शिल्पा होले व आर्ट ऑफ लिव्हिंगच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

सह्याद्रीचा राखणदार



# विधवा महिलांना वाऱ्यावर सोडणे बरे नव्हेच!

**आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड-१९ साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो.**

विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती. काय आहे विधवा दिनाचा इतिहास? कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे. त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

काय आहे विधवा दिन साजरा करण्याचा उद्देश? जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही. जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वाऱ्यावर सोडले जाते. यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे. जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात चार कोटींहून अधिक



विधवा महिला आहेत. आजही विधवा महिला त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत. या विधवा महिलांना पती नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एक उदाहरण आहे- जोवेरिया नाबुकेन्या एक विधवा, इसिंगिरो जिल्ह्यात तिच्या काही ८ नातवंडांसोबत वाचते. युनिसेफच्या पाठिंब्याने नाबुकेन्या मुख्य कौटुंबिक काळजी प्रॅक्टिसेसवर आहेत. तिची एक दिनचर्या आहे जिथे ती मुलांसोबत वाचते आणि ते शिकत असताना त्यांच्यासोबत खेळते. जगभरातील बऱ्याच महिलांसाठी, त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी दीर्घकालीन लढ्याने जोडीदाराचा विनाशकारी तोटा वाढविला जातो. जगभरात २५८ दशलक्षाहून अधिक विधवा असूनही, विधवांना ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या समाजात न पाहिलेले, समर्थन न मिळालेले आणि मोजले गेलेले नाही. भूतकाळातील अनुभव दर्शवितो, की विधवांना अनेकदा वारसा हक्क नाकारले जातात, जोडीदाराच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता बळकावली जाते आणि रोगाचे 'वाहक' म्हणून त्यांना अत्यंत कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. जगभरात, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे, म्हणून जोडीदाराच्या मृत्यूमुळे वृद्ध स्त्रियांना निराधारपणा येऊ शकतो. लॉकडाऊन आणि आर्थिक बंदच्या संदर्भात विधवांना ते खूप आजारी पडल्यास किंवा स्वतःला आणि त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांना बँक खाती आणि पेन्शन मिळू शकत नाहीत. एकटी-माता कुटुंबे आणि अविवाहित वृद्ध स्त्रिया आधीच विशेषतः गरिबीसाठी असुरक्षित आहेत, हे एक क्षेत्र आहे ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनी जगभरातील विधवांवर परिणाम करणाऱ्या काही समस्या आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रगती करण्यासाठी काय केले पाहिजे यावर एक नजर टाका.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

युनायटेड नेशन्स सन २०११पासून २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिवस म्हणून पाळत आहे, विधवांच्या आवाजाकडे आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असलेला अनोखा पाठिंबा मिळवण्यासाठी पाळला पाहिजे. आता पूर्वीपेक्षा अधिक हा दिवस विधवांना पूर्ण हक्क आणि मान्यता प्राप्त करण्याच्या दिशेने कृती करण्याची संधी आहे. यामध्ये त्यांना त्यांचा वारसा, जमीन आणि उत्पादक संसाधनांचा वाजवी वाटा मिळण्याची माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे; निवृत्तीवेतन आणि सामाजिक संरक्षण जे केवळ वैवाहिक स्थितीवर आधारित नाही; सभ्य काम आणि समान वेतन; आणि शिक्षण आणि प्रशिक्षण संधी. विधवांना स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी सक्षम करणे म्हणजे सामाजिक कलंक दूर करणे ज्यामुळे बहिष्कार आणि भेदभाव किंवा हानिकारक प्रथा निर्माण होतात. शिवाय महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलनाचा करार आणि बालहक्कावरील अधिवेशनासह आंतरराष्ट्रीय कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विधवांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी सरकारांनी त्यांच्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे. विधवांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय कायदे अस्तित्वात असतानाही, अनेक राज्यांच्या न्यायिक व्यवस्थेतील कमकुवतपणामुळे विधवांच्या हक्कांचे व्यवहारात संरक्षण कसे केले जाते आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे. न्यायिक अधिकाऱ्यांकडून जागरूकता आणि भेदभावाचा अभाव यामुळे विधवा न्याय व्यवस्थेकडे नुकसान भरपाई मागण्यासाठी वळू शकत नाहीत. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृती योजनांच्या संदर्भात विधवा आणि त्यांच्या मुलांवरील हिंसाचार, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि सर्व वयोगटातील विधवांना इतर समर्थन यासाठी कार्यक्रम आणि धोरणे देखील हाती घेणे आवश्यक आहे. संघर्षानंतरच्या परिस्थितीत विधवांना शांतता निर्माण आणि सलोखा प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणले पाहिजे जेणेकरून ते शाश्वत शांतता आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील आणि कोविड-१९च्या संदर्भात विधवांना पुन्हा चांगले सक्षम बनवण्यासाठी आमच्या कामातून सोडले जाऊ नये. आमची पुनर्प्राप्ती त्यांच्या अनन्य गरजांना प्राधान्य देते आणि समाजांना अधिक समावेशक, लवचिक आणि सर्वांसाठी समान होण्यासाठी समर्थन देते, याची खात्री करूया.

!! जागतिक विधवा दिनानिमित्त समस्त विधवा भगिनींना हार्दिक शुभकामना जी !!

---

### राजुरा विधानसभा क्षेत्रातून जाणाऱ्या


# राष्ट्रीय महामार्गावरील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा

## विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांची मागणी

**राजुरा । प्रतिनिधी**

राजुरा विधानसभा क्षेत्रातील राजुरा व कोरपना तालुक्यातून जाणाऱ्या राजुरा-बामणी-लक्कडकोट (एन.एच. ९३०ऊ) आणि राजुरा-आदिलाबाद (एन.एच. ३५३इ) या दोन्हीही महामार्गावरील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्यासाठी संबंधित कंत्राटदाराला तात्काळ निर्देश देण्याची मागणी भाजपाचे राजुरा विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांनी पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी चंद्रपूर तसेच प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग यांना पाठविलेल्या पत्रातून केली आहे.

महाराष्ट्र व तेलंगाणा या दोन राज्यांना जोडणारा राजुरा-बामणी-लक्कडकोट (एन.एच. ९३०ऊ) तसेच राजुरा-आदिलाबाद (एन.एच. ३५३इ) या दोन्हीही राष्ट्रीय महामार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. या रस्त्यांच्या कामांची उंची जवळपास ५ ते ७ फूट वाढवण्यात येत आहे; परंतू पावसाळ्याच्या दिवसांत रस्त्यावरील



पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी संबंधित कंत्राटदाराने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे हे पाणी लगतच्या शेतशिवारात शिरून शेतपिकांचे प्रचंड नुकसान होण्याचा धोका संभवतो. अशाच ढिसाळ नियोजनामुळे गतवर्षी कोरपना तालुक्यातील शेकडो हेक्टर शेतजमीनी पाण्याखाली येऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते.

त्यामुळे यावर्षी पुन्हा तशी परिस्थिती उद्भवू नये. आणि शेतकर्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावण्याचे पाप घडू नये, यासाठी विधानसभा क्षेत्रातील राजुरा व कोरपना तालुक्यातून जाणाऱ्या राजुरा-बामणी-लक्कडकोट (एन.एच. ९३०ऊ) आणि राजुरा-आदिलाबाद (एन.एच. ३५३इ) या दोन्हीही राष्ट्रीय महामार्गावरील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने संबंधीत विभागाला व कंत्राटदाराला तात्काळ निर्देश द्यावे, अशी मागणी भाजपाचे राजुरा विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांनी पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी चंद्रपूर तसेच प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे.

---

# 'आनंदवन 'येथील ग्रामस्थांनी केले कृषीकन्यांचे स्वागत





**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती द्वारा संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक अंतर्गत आनंदवन येथे दाखल झाले असून ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले .

त्यामध्ये कृषी कन्या नुपूर कटरे, अक्षता कुबडे, सायली गीरी, मधुरा नरवाडे ,राजश्री खोब्रागडे यांचा समावेश असून तीन महिने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

शेतकऱ्यांसाठी विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिके दाखविणार आहेत, त्यात माती व पाणी परिक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान ,पिकांवर येणारे रोग व कीड यांचे व्यवस्थापन,

जनावरांची काळजी व संगोपन शेतीशी निगडित विविध समस्यांचे निराकरण, बीज प्रक्रिया या विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. या प्रसंगी सरपंच रूपवंती दरेकर , उपसरपंच शौकत अली , शेतकरी गणेश कडसकर व ग्रामस्थ उपस्थित होते. या ग्रामीण कृषी कार्यनुभव कार्याकरिता कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार , कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. वि. महाजन ,कार्यक्रम समन्वयक डॉ. आर तायडे , कार्यक्रम अधिकारी डॉ. एम.एम. पातोंड ,डॉ. एस इमडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

---

# शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्या साठी योग आवश्यक-अशोक नेते

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत मनुष्याला शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य टिकवणे कठीण जाते. पण योगासारखा व्यायामाच्या प्रकाराने शारीरिक आणि मानसिकदृष्ट्याही आपल्याला सुदृढ राहता येते. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय योगाचे महत्व जगाला सांगून २१ जून या दिवसाला जागतिक योग दिन म्हणून मान्यता मिळवून दिली. आपणही नियमित योगा करत त्याचे महत्व समजून घेतले पाहिजे, अशी भावना व्यक्त करत माजी खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु. जनजाती मोर्चाचे अशोक नेते यांनी जागतिक योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मा.खा.अशोक नेते यांनी जागतिक योग दिनाचे औचित्य साधून स्वत: योगासने केली. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातील नागरिकांनी आणि भाजपच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनीही नियमित योगासने करण्याचे आवाहन त्यांनी केले.



---

# पतंजली परिवार तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा




**पुलगाव । प्रतिनिधी**

शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा पतंजली योग परिवार, पुलगांव तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहाने साजरा करण्यात आला. त्यासाठी शुक्रवार दिनांक २१ जुन २०२४ रोजी योग भवन, तहसील कार्यालय जवळ आठवडी बाजार रोड, पुलगांव येथे सकाळी ५:३० ते ७:०० वाजेपर्यंत ब्रम्ह-मुहूर्तावर साजरा करण्यात आला. सकाळी पावसाची रिमझिम सुरु असल्याने योगासने हॉल मध्ये घेण्यात आला. पुलगांव करांनी योग दिवसाला चांगली साथ दिली. पतंजली योग परिवारातील योग शिक्षक यांनी केंद्रीय विद्यालय, गांधी सिटी पब्लिक स्कूल, एस. पी. कॉलेज, ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन योगाचे धडे देऊन विश्व योग दिन साजरा करण्यात आला.

पुलगांव-नाचणगांव शहरातील सर्व योग प्रेमी, योग शिक्षक, पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. योग दिवसाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री वसंत वरभे, महेश आहुजा, हरबंस सतीजा, प्रमोद बमनोटे, श्रवण मंडले, दत्ता पाटोळे,माथने , डॉ. घारपुरे, नंदा देव्हारे, नलिनी ढोबळे, शोभा सतीजा, ममता निकम, भारती मलीक, लता आठवले, वंदना शिरभाते, दिपाली घोंगे यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

# शरीराला आहारासोबतच योग आवश्यक-सरपंच गिता बोरकर



**तळोधी (बाळापुर)**-जिवन जगत असताना निरोगी आरोग्य असणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी शरीराला आहारासोबतच योग आवश्यक आहे. म्हणून फक्त योग दिनाच्या दिवशीच योग न करता योग दररोज करा असे प्रतिपादन गिरगाव येथील सरपंच गिता बोरकर यांनी केले. ग्रामपंचायत गिरगाव आणि दैनंदिन पंतजली प्रभात योग शाखा गिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला त्यावेळी त्यांनी उपस्थित योग मार्गदर्शन केले. यावेळी पतंजली योगपीठ हरिद्वार येथून प्रशिक्षित योग शिक्षक निरंजन बोरकर आणि सहयोग शिक्षिका आशा बोरकर यांनी उपस्थितांना विविध योग प्राणायाम करून दाखवित, प्रात्यक्षिके करून घेण्यात आले . यावेळी योग साधिका निर्मल आंबडारे, वनिता आंबडारे, विजुताई बोरकर, देवकी बोरकर,लिलाबाई बोरकर, बाली बोरकर,मुन्नी बोरकर, सुरेखा बोरकर,प्रतिभा बोरकर, भारती बोरकर, क्रिष्णा बोरकर, सतिश बोरकर, शुभम आंबडारे, आणि इतर योग प्रेमी मंडळी उपस्थित होती.

# विजय नगरकर मित्र मंडळाच्यावतीने राजेंद्र लांडगे यांचा वाढदिवस साजरा

# श्रीरामपूर जिल्हा होणे आजच्या मितीस काळाची गरज-शौकतभाई शेख

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

येथील डॉक्टर शिवराज नगरकर सभागृहात विजय नगरकर मित्र मंडळाच्यावतीने श्रीरामपूर जिल्हा संघर्ष समिती संस्थापक अध्यक्ष राजेंद्र (ऊर्फ राजाभाऊ) लांडगे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शौकतभाई शेख होते. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी श्री.लांडगे यांच्या श्रीरामपूर जिल्ह्यासाठी करत असलेल्या संघर्षमयी जीवन प्रवासावर आपल्या शुभेच्छारुपी मनोगताद्वारे प्रकाशझोत टाकला.यावेळी नागेशभाई सांवत यांनी आपल्या दमदार शैलीत श्रीरामपूर जिल्हा का आवश्यक आहे याविषयी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,मी कामगार नेता या नात्याने गेली अनेक वर्षे कामगार चळवळ चालवत आहे, कामगारांच्या काय समस्या असतात त्या मी जवळून बघतो आहे, आम्ही सर्व श्रीरामपूर जिल्ह्यासाठी अग्रही असून श्रीरामपूर जिल्हा झाल्यास मोठ्या प्रमाणात स्थानिक रोजगार उपलब्ध होवून कोणासही कामासाठी बाहेर जाण्याची गरज



भासणार नाही, श्री.राजाभाऊ लांडगे यांनी मोठा जिव्हाळ्याचा तथा सर्वांच्या फायद्याचा विषय हाथी घेतला आहे,त्यास लवकरच न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे असेही ते म्हणाले.यावेळी बोलताना विजय नगरकर म्हणाले की, श्रीरामपूर जिल्हा होण्यासाठी श्री.राजाभाऊ लांडगे यांनी स्वतः पदरमोड करत मोठी चळवळ उभारली आहे, त्यांचे हे कार्य भविष्यात सर्वांसाठी खुपच फायद्याचे ठरणार असून श्रीरामपूर जिल्हा झाल्यास स्थानिक तरुणांना नोकरीसाठी इतरत्र भटकंती करण्याची आवश्यकता राहणार नसल्याचे ते म्हणाले. या प्रसंगी समता फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शौकतभाई शेख म्हणाले की, श्रीरामपूर जिल्हा झाल्यास नवनवीन उद्योग, व्यावसाय श्रीरामपूर जिल्ह्यात येतील स्थानिकांना यानिमित्ताने मोठा रोजगार उपलब्ध होईल,कामांच्या शोधात कोणास बाहेरगावी जाण्याची आवश्यकता राहणार नाही, राजाभाऊ लांडगे यांचा हा संघर्ष हा समस्त भावी श्रीरामपूर जिल्हावासियांसाठीचा आहे. श्रीरामपूर जिल्हा व्हावा यासाठी इतर अनेक सामाजिक कार्यकर्ते देखील मोठ्या जिकरीने चळवळी चालवित आहेत, श्रीरामपूर जिल्हा व्हावा ही आजच्या मितीस काळाची गरज असल्याने आज ना उद्या शासनास श्रीरामपूर जिल्हा करावाच लागणार असल्याचेही ते म्हणाले.तर सत्काराला उत्तराखातर श्रीरामपूर जिल्ह्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत लढाणार असल्याचा श्री. राजाभाऊ लांडगे यांनी पुनरुच्चार करत वाढदिवस प्रित्यर्थ केलेला सत्कार हा लाख मोलाचा आहे यातून आपल्या सर्वांचे स्नेह,प्रेम आणी आपूलकीचे दर्शन घडले असे म्हणत उपस्थित सर्वांचे आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विजय नगरकर, कामगार नेते नागेश भाई सावंत, समता फाऊंडेशन चे शौकतभाई शेख, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे माणिकराव जाधव, विधिज्ञ सोपानराव पठारे अशोक लोंढे, हाफिज अनिस पठाण, सुनील इंगळे, संजय सोमवंशी, रॉयल रिश्ता डॉटकॉम चे कलीमभाई शेख आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन ऍड.सोपानराव पटारे यांनी केले तर अशोक लोंढे यांनी आभार मानले.

# मोकाट जनावराच्या मालका विरुद्ध गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मोहल्ला शहागंज येथे मोकाट जनावराच्या मालकाने जनावरे पकडण्यास अटकाव केल्याने त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज दि.२१.०६.२०२४ रोजी सकाळी ९:३० वाजता मोहल्ला शहागंज येथे मोकाट जनावरे पकडण्याकरीता सोबत कर्मचारी १) रोहीदास कचरू घायट, २) विठ्ठल जगन्नाथ बागुल, ३) कैलास नामदेव अवसारमोल, ४) विठ्ठल नाना राठोड, ५) सय्यद वसीम वाहन क्र. एम.एच.२० जी.सी. ६३१८ वाहनचालक राजेंद्र जैस्वाल असे मोकाट जनावरे पकडण्यास गस्त घालत असतांना निजामुद्दीन रोड जवळ, सुलेमान मस्जिद

रनमस्तपुरा येथे जुबेर शरीफ कुरैशी धावून येऊन शिवीगाळ करून ही जागा मनपाची नाही. मंदिराची आहे असे म्हणून सदर इसमाने पथकाने पकडण्यासाठी जमा केलेली ०५ जनावरे पळून लावली. मध्यवर्ती कोंडवाडा अंतर्गत १ एप्रिल २०२४ ते ३० मे २०२४ या कालावधीत मोठी जनावरे - २५८ व लहान जनावरे १० असे एकुण २६८ जनावरे पकडण्यात येऊन दंडापोटी रु.१,०६,९०० - दंड वसुल करण्यात आला आहे. करिता जुबेर शरीफ कुरैशी रा.शहागंज यांच्या विरूध्द कंत्राटी पशुधन पर्यवेक्षक रोहीदास कचरू घायट यांच्या फिर्यादीने सिटीचौक पोलिस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर भा.दं.वि.१८६, ५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.अशी माहिती प्र.पशू वैद्यकीय अधिकारी शेख शाहेद यांनी दिली आहे.

# शिवा संघटना व प्रा मनोहरजी धोंडे सरांचा ओबीसी आरक्षण बचाव समितीला जाहीर पाठिंबा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण बचाव समितीचे, ओबीसीचे नेते मा. लक्ष्मणराव हाके, हे जालना जिल्ह्यातील वडीगोद्री तालुका अंबड येथे मागील आठ दिवसापासुन उपोषणाला बसले आहेत. शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष ओबीसी नेते प्रा. मनोहरजी धोंडे सर यांच्या आदेशान्वये, ओबीसीचा एक मोठा घटक असलेला वीरशैव-लिंगायत समाज व शिवा संघटना यांचा ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके सर व नवनाथ वाघमारे ह्या दोन्ही उपोषण कर्त्यांना व त्यांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा.

आज २१ जून २०२४ रोजी वडीगोद्री येथे



शिवा संघटनेचे जालना जिल्हा व छ.संभाजीनगर जिल्ह्यातील १०० पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ भेटुन ओबीसी नेते प्रा. मनोहरजी धोंडे सर यांच्या आदेशान्वये ओबीसी बचाव समितीला पाठिंब्याचे पत्र देऊन जाहीर पाठिंबा दिला आहे. या शिष्टमंडळामध्ये श्री अशोक फुलशंकर, जिल्हा संपर्कप्रमुख प्रमुख छ.संभाजी नगर, श्री अशोक आप्पा बसापुरे, जिल्हा अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर, श्री कैलास अप्पा गबाळे जालना जिल्हाध्यक्ष शिवा संघटना व ओबीसी नेते शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मनोहरजी धोंडे सर यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे पुतणे शेवडी बा. चे सरपंच तथा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य श्री बसवेश्वर आप्पा धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शंभर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# हिंदू साम्राज्यदिन शिवशक ३५१

**डोंबिवली । प्रतिनिधी**

आज ज्येष्ठ शु. त्रयोदशी शके १९४६ म्हणजेच २० जून २०२४ रोजी छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकास ३५१ वर्षे होत आहेत. रा. स्व. संघ उत्सवातील हा दूसरा उत्सव. समर्थनगर डोंबिवली पूर्व च्या दत्तनगर वस्तीचा उत्सव शास्त्रीहॉल येथे सायंकाळी ६ ते ७. या वेळेत संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली.

अमृतवचन श्री. सतीश जोशी यांनी सांगितले. 'पृथ्वीवरती द्वाही फिरली, शिवरायांच्या अभिषेकाची शिवराया हा राजा झाला सफल जाहली इच्छा प्रभूची' या सांघिक गीतानंतर कार्यवाह श्री. करमरकर यांनी प्रमुख वक्ते श्री. प्रशांत शिरुडे शिक्षक यांचा परिचय करून दिला. त्यानंतर श्री अरुणजी केतकर यांनी वैयक्तिक गीत - 'युगायुगातील हे सिंहासन आज पुन्हा जाहले सचेतन' सादर केले.



कार्यक्रमाचे वक्ते श्री. प्रशांत शिरुडे सर यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवरायांचा ३५१ वर्षानंतरही राज्याभिषेकाचे महत्त्व आजच्या परिस्थितीत समजून घेण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानाची बोटे छाटली, पन्हाळगडाहून विशाळगडाकडे जातांना बाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदानाने घोडखिंड पावनखिंड झाली. आग्र्याहून सुटका करून घेतल्यावर गेलेले सर्व किल्ले मोगलांकडून परत घेतले. एवढेच शिवबांचे कर्तृत्व नाही तर प्रत्येक मोहिमेत संयम, योग्य निर्णय, चपळता, अतुलनीय पराक्रम व दृढनिश्चयाचे झालेले प्रकटीकरण आजही आचरणात आणण्याची आवश्यकता आहे.

'हिंदूंचा राजा असू शकतो' ही भावना समाजात रुजविण्यासाठी शिवरायांनी गागाभट्टांकडून स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. त्या राज्याभिषेकाचे वर्णन ऐकतांना, वाचतांना आपण आजही हर्षभरीत होतो, शिवरायांनी रयतेत 'स्व' ची जाणीव निर्माण केली. त्यांनी शेतकऱ्यांना आर्थिक मदत न करता बी, बियाणे, खते, शेतीचे सामान अशी मदत केली. त्याबरोबरच शेतकऱ्यांना सैनिकी शिक्षण दिले. स्वतःचा राज्य व्यवहारकोष, राजमुद्रा, चलन, इतकेच नाहीतर 'शिवशक' कालगणना सुरु केली. जबाबदार प्रशासकीय यंत्रणा निर्माण केली.आजही शासनकर्त्यांना निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरे महाराजांच्या विचारधारेत आहे. तरुणांना मार्गदर्शन करताना शिरुडे सरांनी सांगितले की प्रत्येकाने त्याला नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे केले पाहिजे आणि नाविन्याचा स्वीकार करत व्यवसायाभिमुख दृष्टिकोन ठेवला पाहिजे. महाराजांनी समोर चालून आलेली संधी कधीच सोडली नाही व अंतीम ध्येय साध्य केले. शेवटी ते म्हणाले आपल्याला अखंड भारताचे स्वप्न साकार करायचे असेल तर शिवराज्याभिषेकाची व त्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण ठेवावी लागेल असे प्रतिपादन केले. 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' या संघप्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला दत्तनगर परिसरातील मोठा श्रोतुवर्ग उपस्थित होता.

# योग जीवनाला आनंदी आणि उत्साही बनवतात-सिद्धेश्वर झाडबुके

## नाझरा विद्यामंदिर मध्ये योग दिन उत्साहात साजरा



**नाझरा । वार्ताहर**

प्राचीन काळापासून आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये योगाला अनन्य साधारण महत्त्व आहे. योग केल्याने मनाची शुद्धी होते, अंतर्मनाला प्रफुल्लित करण्यासाठी योग ही साधना अत्यंत आवश्यक आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये किमान अर्धा तास योग केला तर प्रचंड बदल आपल्यामध्ये घडून येतील.योग केल्याने आपल्यातील वियोग नष्ट होतील. योग जीवनाला आनंदी व उत्साही बनवतात असे प्रतिपादन सेवानिवृत्त शिक्षक व योगसाधक सिद्धेश्वर झाडबुके यांनी केले.नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या योग दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर प्राचार्य बिभीषण माने,पर्यवेक्षक मधुकर धायगुडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी क्रीडाशिक्षक सासणे यांनी उभे व बैठे योगाचे विविध प्रकार घेत विविध आसनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.प्रशालेतील शिक्षक संभाजी सरगर, प्रा. महेश विभुते,प्रा. मोहन भोसले,दिलावर नदाफ,वसंत गोडसे, योगसाधक सिद्धेश्वर झाडबुके यांनी स्टेजवरती योगाचे विविध आसन प्रकार विद्यार्थ्यांना करून दाखवले. क्रीडाशिक्षक सासणे यांच्या मार्गदर्शनाखाली दहावीतील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे मानवी मनोरे तयार करून कार्यक्रमात रंजत आणली.योगसाधक झाडबुके गुरुजी यांचा प्राचार्य बिभीषण माने यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील जवंजाळ यांनी केले.

# रॉयल रिश्ता डॉटकॉम आणी सुसंगम वधू - वर सुचक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूरात सर्व धर्मिय वधू वर सुचक केंद्राची स्थापना

## रॉयल चॅरिटेबल ट्रस्ट ची सामाजिक कार्य स्तूतीजन्य-शौकतभाई शेख

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

येथील रॉयल चॅरिटेबल ट्रस्ट संचालित रॉयल रिश्ता डॉटकॉम आणी पुणे येथील सुसंगम वधू - वर सुचक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर शहरात सर्व धर्मीय वधू - वर सुचक केंद्राची स्थापना करण्यात आली असून या निमित्ताने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जुने प्रांत कार्यालय (महसूल भवन) या ठिकाणी रॉयल रिश्ता डॉटकॉम कार्यालयात सदरील सर्व धर्मीय वधू - वर सुचक केंद्राचे अनावरण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. विजय नगरकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी श्रीरामपूर स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे तालुकाध्यक्ष माणिकराव जाधव,समता फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शौकतभाई शेख, ऍड. मोहसिन शेख , सुसंगम वधू - वर सुचक मंडळाचे संचालक बशीरभाई काझी, जैद फराश,हाजी महंमद इसहाक फराश फाऊंडेशन चे चेअरमन इंतेखाब फराश, फैज मॅसेज ब्यूरो पुणे,तथा मोमीन मॅरेज ब्युरो चे शफीभाई मोमीन, रॉयल रिश्ता डॉटकॉम चे संचालक कलिमभाई शेख,कार्यकारी संचालक हाजी नदीमभाई, सदस्य मुश्ताकभाई शेख, सानिया इनामदार आदी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री.विजय नगरकर म्हणाले की वधू -वर सुचक केंद्र यामुळे विवाह करीता आपणास हवे तसे स्थळ मिळण्यात खुपच मदत होते. कारण वर जर डॉक्टर असेल तर त्याची इच्छा असते वधू देखील डॉक्टरच असली पाहिजे,तसेच वकील, इंजिनिअर आणी इतर सर्वच क्षेत्रातील दोन्ही मंडळीकडील अशीच अपेक्षा असते ती यानिमित्ताने इच्छित स्थळ मिळविण्यात मोठी महत्वाची ठरते असेही ते म्हणाले. याप्रसंगी शौकतभाई शेख म्हणाले की,जरी इच्छित स्थळ नाही मिळाले,किंवा वधू मुलगी ही कमी शिकलेली जरी असली तरी तीच्या शिक्षणाची पुढील जबाबदारी वर पक्षाने घेत तीला पुढील इच्छित शिक्षण देण्यात पुढाकार घेतल्यास नक्कीच इच्छापूर्ती झाल्यावाचून राहणार नाही, यासोबतच विवाह समारंभात जास्त व्यर्थ खर्च न करता थोडक्यात विवाह समारंभ उरकले पाहिजेत,ज्यांच्याकडे आर्थीक स्थिती बरी आहे त्यांनी खर्च केले तरी चालते, मात्र ज्याकडे पुरेसे अर्थीक बजट नाही त्यांनी रिन करुन सण साजरा करत असा कोणताही बडेजाव न करता व्यर्थ कर्जबाजारी होवू नये. किंबाहूना वर पक्षाकडील मंडळीने समजूतदारपणा दाखवत वधू पक्षाच्या परिस्थिती नुसारच विवाह समारंभ आटोपल्यास त्याचा दोन्ही पक्षाला आयुष्यभराचा निश्चितच फायदा पोहोचेल यावर विचार होणे देखील मोठे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. तसेच आम्ही अनेक वर्षांपासून बघतो आहोत कलिमभाई शेख आणी त्यांची टीम रॉयल चॅरिटेबल ट्रस्ट च्या माध्यमातून विविध सामाजाभिमुख उपक्रम ही सातत्याने राबवीत असतात, उपेक्षित घटकांतील दुर्लक्षीतांना



विविध उपक्रमांच्या माध्यमातून मदतीचा हात पुढे करत असतात, उपेक्षित घटकांना दवाखाना औषधोपचार, विवाह प्रसंगी मदत,अशा प्रकारे अनेक उपक्रम ट्रस्ट च्या माध्यमातून राबविली जातात त्यांची ही समाजसेवा देखील उपस्थित घटकांना मोठ्या फायद्याची ठरली व ठरत असल्याने रॉयल चॅरिटेबल ट्रस्ट ची सर्वच सामाजिक कार्य उपेक्षित घटकांसाठी खुपच फायद्याची ठरली व ठरत असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी रॉयल रिश्ता डॉटकॉम संचालक कलिमभाई शेख आपल्या प्रस्तावीकात म्हणाले की, सुमारे आडीच वर्षांपासून आमचे रॉयल रिश्ता डॉटकॉम हे शहर, तालुका व परिसरात सेवा देत आहे,या माध्यमातून आजवर जवळपास पंधराशे पेक्षा अधिक एच्छिक आणी योग्य स्थळ जमविण्यात यश आले आहे, केवळ रु.९९९ अशा अल्पदरात ही सेवा मिळत असून दिव्यांग बंधू - भगीनींच्या बाबतीत कोणतीच फी अकारली जात नाही,आगदी विनामूल्य त्यांना सेवा दिली जात आहे. पुणे येथील सुसंगम वधू - वर सुचक केंद्राच्या माध्यमातून यापूढे सर्व जाती- धर्मातील वधू - वरांना उदा.डॉक्टर, इंजिनिअर,सरकारी नोकरीत असलेले, अविवाहित तरुण - तरुणी (वधू - वर), विधवा, परित्याक्ता अशा ऐच्छिक स्थळासाठी सेवा देण्यास आमचे रॉयल रिश्ता डॉटकॉम सदैव तत्पर असुन ज्या कोणास आवश्यकता असेल त्यांनी सेवेसाठी रॉयल रिश्ता डॉटकॉम (सर्व धर्मीय वधू - वर सुचक मंडळ) जुने प्रांत कार्यालय (महसूल भवन) छत्रपती शिवाजी महाराज चौक श्रीरामपूर - मोबाईल क्रमांक: ८०५५२७४०३०/ ९११२२७४०३० यावर संपर्क करावा अथवा समक्ष भेट देवून सेवेची संधी द्यावी असेही ते म्हणाले. या प्रसंगी ऍड. मोहसिन शेख, सुसंगम वधू - वर सुचक मंडळाचे संचालक बशीरभाई काझी,जैद फराश, रॉयल रिश्ता चे मुश्ताकभाई शेख व इंतेखाब फराश, शफीभाई मोमीन आदि मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी रॉयल रिश्ता डॉटकॉम चे सदस्य नदीमभाई शेख, श्रीरामपूर जिल्हा संघर्ष समिती चे श्री.राजेंद्र लांडगे, हाफीज अनिसभाई पठाण, बाभळेश्वर येथील नजीरभाई शेख, मोहसिन ए मिल्लत कमेटी महिला विंग संयोजिका फरजाना बाजी, कमेटी सहयोगी नदिम ताज आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुयोग्य सुत्र संचालन ऍड.मोहसिन शेख यांनी केले तर शेवटी कलिमभाई शेख यांनी आभार मानले.

## जहाल मोर्हक्या नक्षली गिरीधरचे सपत्नीक आत्मसर्पण

# गडचिरोलीतील माओवादी चळवळीची कंबर मोडली-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोलीतील जहाल माओवादी आणि जिल्ह्यातील नक्षली चळवळीचा मोर्हक्या समजल्या जाणार्या गिरधरने आज पत्नीसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. पोलिसांच्या या यशामुळे गडचिरोलीतील माओवादी चळवळीची कंबर मोडली असल्याचे श्री फडणवीस यांनी सांगितले. श्री देवेंद्र फडणवीस यांनी या दाम्पत्याला संविधानाची प्रत भेट दिली. एका छोटेखानी कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नक्षली दाम्पत्याला २५ लाख रुपयांची मदत पुनर्वसनासाठी करण्यात आली.

आत्मसमर्पित माओवाद्यांचा मेळावा व माओवाद्यांच्या कुटुंबियांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन पोलिस मुख्यालयातील एकलव्य हॉल येथे करण्यात आले होते. आमदार देवराव होळी, आ. कृष्णा गजबे, जिल्हाधिकारी संजय दैने, नक्षल विरोधी अभियानाचे महानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक श्री निलोत्पल यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

नांगसू मनकू तुमरेटी ऊर्फ गिरीधर याचेवर २५ लाखांचे बक्षीस होते, तर त्याच्या पत्नीवर १६ लाखांचे बक्षीस होते. गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ नक्षली कमांड असलेल्या या दोन्ही नक्षल्यांनी आत्मसमर्पण केल्याने जिल्ह्यातील नक्षलवादी कारवायांना मोठा हादरा बसला आहे. माओवादी गतिविधीचे प्रमुख म्हणून या दोघांकडे पाहिले जायचे. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गेल्या ४ वर्षांत जिल्ह्यातील एकही व्यक्ती नक्षली कारवायात सहभागी झाला नाही, हे यश आमच्या पोलिस दलाने मिळविले आहे. सी-६० पथकाने आपला दरारा असा निर्माण केला की, एकतर त्यांना शरणागती पत्करावी लागेल किंवा बंदुकीचा सामना करावा लागेल. ते या पथकाचे मोठे यश आहे. गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादाचे कंबरडे मोडले आणि दुसरीकडे सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवल्या. अंतिम माणसाच्या विकासाचाच हा प्रयत्न आहे. शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहोचू नये, हाच प्रयत्न नक्षलवाद्यांनी केला. पण, आज तो विकास पोहोचतो आहे, हे मला अनेक दुर्गम भागात जाऊन पाहता आले आहे. गडचिरोली



हा आमच्यासाठी महाराष्ट्राचा शेवटचा नाही, तर पहिला जिल्हा आहे. म्हणून या जिल्ह्याचा विकास आमच्यासाठी महत्त्वाचा आहे. उद्योग, रोजगार, कौशल्य प्रशिक्षण, शिक्षण यासाठी मोठा प्रयत्न हाती घेण्यात आला आहे. मोठी गुंतवणूक या जिल्ह्यात येत आहे. कालही काही प्रकल्पांबाबत मी बैठक घेतली, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात आदिम जमातींसाठी २४,००० कोटींची योजना, आदिवासी संस्कृतीचे जतन, देशातील प्रथम आदिवासी महिला राष्ट्रपती अशा अनेक घटना या आदिवासींना बळ देणार्या आहेत. शिस्त आणि संवेदना एकत्र झाल्यानेच गडचिरोली पोलिसांबद्दल आदराची भावना आहे, असेही गौरवोद्गार देवेंद्र फडणवीस यांनी काढले.पोलिस भरतीला स्थगिती दिली तर १७,००० पदांची भरती विधानसभांची आचारसंहिता लागणार असल्याने पुढच्या वर्षावर जाईल. त्यानंतर आणखी ९००० पोलिस भरती करायची असल्याने आणखी एक वर्ष लांबणीवर जाईल. त्यामुळे जेथे पाऊस आहे, तेथे दुसरी तारीख देऊन पदभरती पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. आज गडचिरोलीत तर आपण केवळ स्थानिकांचीच भरती करतो आहोत. १००० पदांसाठी गडचिरोलीतील २८,००० युवकांनी अर्ज भरले आहेत. त्यांचे वयाचे नुकसान होऊ नये, असे सांगून वेळेतच पोलिस भरती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असेही फडणवीस म्हणाले. एकीकडे नक्षली दलात एकही व्यक्ती भरती होत नाही व पोलिस दलात भरतीसाठी २८ हजार अर्ज यातून नागरिकांचा संविधानाप्रती व्यक्त विश्वास दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रसार माध्यमांनी देखील गडचिरोलीची प्रतिमा उंचावण्यात महत्वाचे योगदान दिल्याबद्दल त्यांनी माध्यमांना धन्यवाद दिले.नक्षल विरोधी अभियानाचे महानिरीक्षक अंकित गोयल यांनी केंद्र व राज्य शासनाकडून नक्षलविरोधासाठी कायम सहकार्य व मदत मिळत असल्याचे सांगितले तर जिल्हा पोलिस अधिक्षक श्री निलोत्पल यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून नक्षलविरोधी कार्याची माहिती दिली.

# यावली येथे प्रभाकर फौंडेशन चा वतीने मोफत गणवेश वाटप



**बार्शी । प्रतिनिधी**

तालुक्यातील यावली येथे बळवंतराव घाटे प्रशाला या शाळेमध्ये प्रभाकर फाउंडेशन ठाणे यांचा तर्फे दरवर्षी शालेय साहित्य वाटप करण्यात येते त्या अनुषंगाने स.न.२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठीबळवंतराव घाटे प्रशाला यावली ता. बार्शी येथे इयत्ता ५ वी ते १० वी मधील नवीन प्रवेश घेतलेल्या आणि पूर्वीच्या अशा १३० विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले.आणि लवकरच सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप ही करण्यात येणार आहेत.प्रभाकर फाउंडेशन मधील सर्व पदाधिकारी व उद्योजक गिरीष घाटे यांचे या उपक्रमाचे प्रशाले तर्फे कौतुक करण्यात आले.यावेळी मुख्याद्यापक डी. एन. चव्हाण, सहशिक्षक एच. एम. उबाळे, एन. व्ही. काकडे, अर्चना हाक्के, शोभा तुळसे, बापूराव गव्हाणे, राजेंद्र तुरे व प्रशालेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या हस्ते

# जगविख्यात 'मकून्स' च्या सोलापूर जिल्ह्यातील पहिल्याच प्रि-स्कूलचा बार्शीत शुभारंभ





**बार्शी । प्रतिनिधी**

वाजवी शालेय फी मध्ये बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्याधुनिक अद्ययावत सुविधांसह सुसज्ज 'मकून्स' या प्रि-स्कूल चा शुभारंभ माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या हस्ते परांडा रोड, गांधी चौक येथे १५ जून रोजी करण्यात आला.

शुभारंभ प्रसंगी बार्शी नगरपरिषद शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे ,केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे बार्शी सेक्रेटरी जनाब मोइझभाई काझी, दंतरोगतज्ञ वर्षा शेळके, पत्रकार तथा वैचारिक चळवळीचे लेखक ; स्मार्ट अकादमी या वक्तृत्व प्रशिक्षण चळवळीचे संचालक सचिन वायकुळे , बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरिक्षक मुळीक, बार्शी दिवाणी फौजदारी न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ एम. पी. धस, जनसेवा संघटनेचे अध्यक्ष वैभव भैय्या पाटील बार्शी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक शंकरराव देवकर, प्रख्यात व्यवसायिक दत्तात्रय बाबर. अध्यापक विद्यालय चारे माजी प्राचार्य नंदकुमार काशीद, पंचायत समिती बार्शी कृषी अधिकारी किशोर अंधारे, पुरोगामी चळवळीचे वक्ते किशोर मांजरे, मुंबई पोलीस दलातील पोलीस उपनिरिक्षक प्रितम बरबडे , वारकरी सांप्रदायिक संस्थेचे ह.भ.प भास्कर मांजरे महाराज यांचेसह बालक पालक उपस्थित होते. यावेळी शाळेचे स्थानिक विश्वस्थ निलेश मांजरे पाटील, समीना चिस्ती, अफरोज पठाण यांनी उपस्थितांना शाळेच्या नावीन्य पूर्ण अभ्यासक्रमाबाबत माहिती दिली. शुभारंभाचे प्रमुख पाहुणे माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या हस्ते शाळेचा शुभारंभ करण्यात आला. उपस्थित मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. शाळेचे स्थानिक विश्वस्थ निलेश मांजरे पाटील, समीना चिस्ती, अफरोज पठाण यांनी मकून्स शाळेच्या शैक्षणिक उत्कृष्टता , नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम , हे प्रत्येक मुलाच्या वैयक्तिक गरजा, प्रतिभा, क्षमता आणि आवडीनुसार कसे तयार करण्यात आलेले आहेत याबाबत माहिती दिली .बार्शीतील बालकांना जागतिक दर्जाचे अत्याधुनिक अभ्यासक्रमाचे अनौपचारिक आणि औपचारिक शिक्षण बालपणापासून आवड निर्माण करून गोडी लावण्यासाठी सुरू केलेल्या उपक्रमास उपस्थितांनी शुभेछा दिल्या. शाळा उभारणीसाठी विशेष सहकार्य रमिझ पठाण यांचे लाभले.

# पीक कर्ज वाटपाच्या प्रक्रियेची गती वाढवा पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश

## ना.मुनगंटीवार यांनी घेतला कृषी व संलग्नित विभागांचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या खरीप हंगामाला सुरवात झाली आहे. या हंगामावरच शेतकऱ्यांचा संपूर्ण आर्थिक डोलारा उभा राहतो. पेरणीच्या वेळेस बियाणे, खते घेण्यासाठी शेतकऱ्यांना आज पीक कर्जाची अत्यंत गरज आहे. त्यामुळे पीक कर्ज वाटपाच्या प्रक्रियेची गती वाढवून शेतकऱ्यांना वेळेवर पैसे उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शनिवारला दिले.

नियोजन सभागृह येथे कृषी व कृषी संलग्न विभागासोबत खरीप हंगामाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माच्या प्रकल्प संचालीका प्रिती हिरुळकर, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, रामपालसिंग व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.पीक कर्ज वाटपात विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, असे सांगून पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, शेतक-यांना वेळेवर कर्ज उपलब्ध होण्यासाठी बँकांनी विशेष शिबिर घेऊन कर्जवाटप करावे. कर्जवाटपासाठी बँकेत अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करावे. राष्ट्रीयकृत बँकांची कर्जवाटपाची गती अतिशय कमी आहे. यात सुधारणा करावी. २० ते २२ ग्रामपंचायती संलग्न असलेल्या एखाद्या बँकेत केवळ ८० शेतक-यांना कर्ज वाटप होत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे. व्यवस्थापक किंवा एखाद्या संबंधित व्यक्ती उपलब्ध नसला तर सदर कार्यभार दुस-या कर्मचा-यांकडे सोपवून पीक कर्ज वाटपाची प्रक्रिया सोयीची करावी, असे निर्देश पालकमंत्री मुनगंटीवार यांनी बँकांना दिले. गतवर्षीपासून शासनाने १ रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली आहे. यापूर्वी केवळ ५० ते ६० हजार शेतकरी या योजनेत सहभागी होत होते. मात्र गतवर्षी जिल्ह्यातील जवळपास ३ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. ही चांगली बाब असल्याचेही ना. मुनगंटीवार म्हणाले. यावेळी पालकमंत्री मुनगंटीवार यांनी खरीप हंगाम २०२४-२५ चे नियोजन, बियाणे व खतांची उपलब्धता, गुणनियंत्रणाबाबत कार्यवाही, अनधिकृत कापूस बियाणे विक्रीविरुध्द कार्यवाही, प्रधानमंत्री पीक विमा योजना, २०२३-२४ मध्ये नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खरीप व रब्बी मध्ये पिकांचे झालेल नुकसान, नुकसानभरपाईचे अनुदान वाटप, पीक कर्ज वाटप, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रलंबित कृषी पंप जोडणी यासोबतच आत्मा अंतर्गत राबविण्यात येणारे विविध उपक्रमाचा आढावा घेतला.सादरीकरणात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तोटावार यांनी सांगितले की, सद्यस्थितीत जिल्ह्यात खरीपाचे हंगामाकरिता ७७७ कोटी रुपये पीककर्ज वाटप करण्यात आले असून त्याची टक्केवारी ६२.१४ टक्के इतकी आहे.आतापर्यंत सर्वाधिक चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ९४ टक्के पीक कर्ज वाटप केले आहे . उर्वरित जून अखेरीज वाटप करण्या बाबत सर्व बँकाना



निर्देश पालकमंत्री महोदयांनी यांनी दिले आहे.पीक विमा योजने अंतर्गत ९१ कोटी ६२ लाख मंजूर झाला असून आतापर्यंत २५ कोटी ४५ लाख पीक विमा शेताकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आला आहे.आजच १७ कोटी रुपये पीक विमा पोर्टलवर अपलोड करण्यात आलेला आहे. उर्वरित रक्कम जून अखेर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत ओरियंटल विमा कंपनीला निर्देश दिले आहे .जिल्ह्यात एकूण लागवडीलायक क्षेत्र ५ लक्ष ५२ हजार ७२९ हेक्टर असून सर्वसाधारण खरीपाचे क्षेत्र ४ लक्ष ५८ हजार ८५७ हेक्टर (८३.०१ टक्के) आहे. जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये १ लक्ष ९१ हजार हेक्टरवर भाताची लागवड, १ लक्ष ८० हजार हेक्टरवर कापूस तर ७५ हजार हेक्टरवर सोयाबीनची लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात या वर्षी आतापर्यंत ४१ हजार ९१८ हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे. जिल्ह्यात २० जून २०२४ पर्यंत ७६ हजार २६३ मे.टन बियाणे उपलब्ध झाले असून यापैकी ४९ हजार ६६३ मे.टन बियाणांची विक्री झाली आहे. तर ८८ हजार मे. टन खते जिल्ह्यात उपलब्ध आहे. बियाणे आणि खतांची कोणतीही कमतरता नसून पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे श्री. तोटावार यांनी सांगितले.

### 'शेतकऱ्यांना कागदपत्रांसाठी अतिरिक्त भुर्दंड पडणार नाही याची काळजी घ्या'

गेल्यावर्षाप्रमाणे यंदाही प्रधानमंत्री पीक विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकरी सहभागी होतील, यासाठी कृषी विभागाने नियोजन करावे. केवळ १ रुपयात या योजनेत सहभागी होता येत असले तरी काही ठिकाणी कागदपत्रांसाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागतात, अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे कृषी व महसूल विभागाने याकडे गांभिर्याने लक्ष देऊन शेतक-यांना अतिरिक्त भुर्दंड पडणार नाही, याची काळजी घ्यावी, अशाही सूचना ना. मुनगंटीवार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .